**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**

**Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon**

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.३ ( ) जपान येथील तोकूशिमा विद्यापीठ व कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ यांच्यात झालेल्या सामंजस्य करारातंर्गत रसायनशास्त्र प्रशाळेतील संशोधक विद्यार्थी निलेश खैरनार हा जपान येथे समर स्कूल ट्रेनिंगसाठी जाऊन आला.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ आणि जपानच्या तोकूशिमा विद्यापीठ यांच्यात सामजंस्य करार झाला आहे. या करानुसार दोन्ही विद्यापीठातील विद्यार्थी, प्राध्यापक यांच्यात उच्च शिक्षणासंदर्भात अदान-प्रदान करण्याचा संयुक्त प्रकल्प प्रस्ताव सादर करण्यात आला होता. या कराराचा एक भाग म्हणून विद्यापीठाच्या रसायनशास्त्र प्रशाळेतील संशोधक विद्यार्थी निलेश खैरनार हा दि. १२ मार्च ते २२ मार्च दरम्यान तोकूशिमा विद्यापीठ येथे झालेल्या समर स्कूल ट्रेनिंग प्रोग्रामसाठी गेला होता. या कार्यक्रमात निलेश खैरनार यांनी आपल्या संशोधनावर आधारीत केलेल्या सादरीकरणाची प्रशंसा त्या कार्यक्रमाचे संचालक प्रा.मीकीतो यासुझावा व समन्वयक डॉ.पंकज कोईनकर यांनी केली. निलेश खैरनार यांना तोकुशिमा विद्यापीठातर्फे अशंतः आर्थिक मदत करण्यात आली होती. दौऱ्याहून परत आल्यानंतर विद्यापीठाचे कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील, प्र-कुलगुरु प्रा.पी.पी.माहुलीकर व प्रशाळेचे संचालक प्रा.डी.एच.मोरे यांनी अभिनंदन केले. निलेश खैरनार यांचे संशोधन प्रा.वि.वि.गिते यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु असून या दौऱ्यासाठी त्यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

---

जा.क्र. : कबचौ उमवि/१६/हस्तदेय/२०१९ दिनांक : ३ एप्रिल,२०१९

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत प्रत/-
(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी